दै. देशोन्नती दि. 18/07/2024

नांदेड | गुरूवार | दि १८ जुलै २०२४



# पोलिसांनी तिघांच्या आवळल्या मुसक्या

## ■ गावठी पिस्तूल, खंजर, सोन्याचे दागिने जप्त

## ■ इतवारा उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांच्या पथकाची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** इतवारा उपविभागाचे उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या पथकाने १६ जुलै रोजी केलेल्या कारवाईत तीन आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून गावठी पिस्तुल, खंजर, सोन्याचे दागिने व मोटारसायकल असा एकूण २ लाख ९० हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभाग इतवारा गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार पोना अर्जुन मुंडे, पोकॉ चंद्रकांत स्वामी, संतोष बेल्लुरोड, श्रीराम दासरे, सायबर शाखेचे राजेद्र सिटीकर, दिपक ओढणे यांनी १६ जुलै रोजी दुपारी ४.४५ वाजताच्या सुमारास कामठेकर यांच्या घराजवळ कौठा येथे छापा टाकुन आरोपी अमन जोगदंड (२०) रा. खोब्रागडेनगर, आकाश गणगोपलवार (२३) रा. पुष्पनगर पावडेवाडी नाका व कपिल सदावर्ते (२७) रा. चेअरमन पाटी पुर्णा रोड यांना ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातील एक गावठी पिस्तुल, एक खंजर, सोन्याचे दागिने व मोटार सायकल असा एकूण २ लाख ९० हजार ७०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोउपनि महेश कोरे हे करीत आहेत.

सदर आरोपींतांनी मागील एक महिन्यापुर्वी रविनगर कौठा व वसमत येथे चैन स्नॅचिंग केले व साठे चौक येथे मोटारसायकल चोरी केल्याचे सांगितले. यावरुन पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण व वसमत शहर अभिलेखावर माहिती काढली असता पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे गुरनं ४८७/२०२४ कलम ३९२, ३४ भादवि, पोलीस स्टेशन वसमत शहर येथे गुरनं ३९३/२०२४ कलम ३९२,३४ भादवि व पोलीस स्टेशन शिवाजी नगर गुरनं २८७/२०२४ कलम ३०३ (२)भा.न्या.स. प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे स्पष्ट झाले आहे.